भिवंडी निजामपूर महानगरपालिकेत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सीपीआर प्रशिक्षणाचे आयोजन

भिवंडी, दि. ०१ (वार्ताहर) : भिवंडी आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने इंडियन मेडिकल असोसिएशन, भिवंडी यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सीपीआर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अचानक हृदयविकाराचा झटका, हृदयक्रिया बंद पडणे किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाचा जीव वाचविण्यासाठी पहिल्या काही मिनिटांचे महत्त्व अत्यंत मोठे असते. अशा प्रसंगी योग्य पद्धतीने सीपीआर करता येणे ही अत्यंत महत्त्वाची जीवनरक्षक कौशल्य आहे. याच उद्देशाने महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सीपीआरचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणास अधिकारी व कर्मचा-यांचा उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद मिळाला. सीपीआर सारखे जीवनरक्षक प्रशिक्षण महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये तसेच आरोग्य केंद्रांमध्ये सातत्याने राबविण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. "योग्य वेळी योग्य सीपीआर म्हणजे एखाद्याला जीवनदान देण्याची संधी" या उद्देशाने महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्याचा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला असून, भविष्यात अशा जीवनरक्षक प्रशिक्षणांचा विस्तार करण्यात येणार आहे.

मंगला लक्षद्वीप एक्सप्रेसमधील आजारी शालेय विद्यार्थ्यांना मध्य रेल्वेची तात्काळ वैद्यकीय मदत

नवी दिल्ली, दि. ०१ (वृत्तसंस्था) : दिल्ली ते त्रिशूर धावणाऱ्या मंगला लक्षद्वीप एक्सप्रेस (गाडी क्र. १२६१८) मधून ३१ ऑगस्ट २०२६ रोजी दिल्लीतील अभ्यास दौरा आटोपून परतणाऱ्या त्रिशूरच्या 'होली फॅमिली सी.जी.एच.एस. स्कूल'च्या ८० विद्यार्थी आणि १० कर्मचाऱ्यांच्या गटातील विद्यार्थ्यांना अचानक उलट्या व जुलाबाचा त्रास सुरू झाला. घटनेचे गांभीर्य ओळखून मध्य रेल्वेने खंडवा जंक्शन येथे डॉक्टर, परिचारिका, रेल्वे अधिकारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांचे पथक सज्ज ठेवून तातडीने उपचार सुरू केले. खबरदारी म्हणून वैद्यकीय पथक विद्यार्थ्यांसोबत गाडीतून त्रिशूरपर्यंत प्रवास करत राहिले. पुढील उपचारासाठी गाडी बुरहानपूर येथेही थांबवण्यात आली; तेथे अशक्त विद्यार्थ्यांना 'इंट्राव्हेनस फ्लुइड्स' (सलाईन/ड्रिप्स) देण्यात आले, तसेच भात, दही, लोणचे आणि केळी यांसारख्या विशेष अन्नाची व्यवस्था करण्यात आली.

धावत्या एक्सप्रेसमध्ये दिवा लावणाऱ्या प्रवाशावर मध्य रेल्वेची कठोर कारवाई

मुंबई, दि. ०१ (प्रतिनिधी) : हजरत निजामुद्दीन - म्हैसूर एक्सप्रेस (गाडी क्र. १२७८२) मधील कोच ए-१, बर्थ १७ वर ३१ ऑगस्ट २०२६ रोजी दिवा लावून पूजा करणाऱ्या गरिबा (वय ५५ वर्षे, रा. ग्वाल्हेर, मध्य प्रदेश) या प्रवाशावर मध्य रेल्वेने कठोर कारवाई केली आहे.

खंडवा येथील तिकीट तपासनीस रमन कुमार शर्मा यांनी आगीचा धोका समजावून सांगूनही प्रवाशाने दिवा विझवण्यास नकार दिल्याने, घटनेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून त्याला भुसावळ रेल्वे स्थानकावर खाली उतरवण्यात आले. त्याच्याकडून आगपेटी, पितळी दिवा आणि स्टीलचा डबा जप्त करण्यात आला. प्रवाशांच्या व मालमत्तेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण केल्याप्रकरणी १ सप्टेंबर २०२६ रोजी रेल्वे कायदा १९८९ च्या कलम १५३ (५ वर्षांपर्यंत कारावास) आणि १४५(ब) अन्वये गुन्हा नोंदवून, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५(क) नुसार नोटीस देऊन सोडण्यात आले. रेल्वेने प्रवाशांना गाडीत दिवे, मेणबत्त्या किंवा ज्वलनशील वस्तू न वापरण्याचे कडक आवाहन केले आहे.

कूपर रुग्णालयात बुरख्यावरून वाद

मुंबई, दि. ०१ (प्रतिनिधी) : विलेपार्ले येथील डॉ. आर. एन. कूपर रुग्णालयात एका महिला सुरक्षा रक्षकाने नवजात शिशू विभागात जाण्यापूर्वी महिलेला बुरखा काढण्यास सांगितल्याचा आरोप झाल्याने वाद निर्माण झाला आहे. वकील जहानारा शेख या आपल्या मैत्रिणीसोबत प्रसूती विभागात दाखल असलेल्या नातेवाईकाला भेटण्यासाठी गेल्या होत्या. प्रवेशद्वारावर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना थांबवल्याचे त्यांनी सांगितले. शेख यांच्या म्हणण्यानुसार, बुरखा घालून आत जाता येणार नसल्याचे सांगण्यात आले. नवजात बालकांच्या सुरक्षेचा आणि बाळ चोरीच्या शक्यतेचा उल्लेख सुरक्षा कर्मचाऱ्यांनी केला असल्याचा आरोप त्यांनी केला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ओळख तपासणी आणि महिलांच्या खासगीपणाबाबत चर्चा सुरू झाली. रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. छाया शिंदे यांनी संबंधित सुरक्षा रक्षकाने बुरखा काढण्यास सांगितल्याची पुष्टी केली. मात्र, संपूर्ण बुरखा काढण्यास सांगण्याऐवजी ओळख पटवण्यासाठी केवळ चेहरा दाखवण्यास सांगायला हवे होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

घटनेनंतर संबंधित सुरक्षा रक्षकाने महिलेची माफी मागितली आहे. रुग्णालय प्रशासनाने नवजात बालकांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त उपाययोजना केल्या असून सुरक्षा रक्षकाला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

FEDBANK FINANCIAL SERVICES LIMITED
फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः युनिट क्र. ११०१, ११वा मजला, सिग्नस, प्लॉट क्र. ७१ ए, पवई, पासपोली, मुंबई - ४०००८७.

स्थावर मालमत्तेच्या लिलाव आणि विक्रीसाठी जाहीर नोटी

याद्वारे फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड (सुरक्षित धनको) द्वारे सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२च्या नियम ८(६) आणि ९(१) सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अंतर्गत स्थावर सुरक्षित मालमत्तेच्या (मालमत्तांच्या) विक्रीसाठी १५ दिवसांची नोटीस देण्यात येत आहे. खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सुरक्षित धनकोचे प्राधिकृत अधिकारी म्हणून सरफेसी कायदा, २००२ अंतर्गत सुरक्षित मालमत्तेचा (मालमत्तांचा) ताबा घेतला आहे.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार/सह-कर्जदार/हमीदारांना नोटीस देण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनको, फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा ताबा सुरक्षित धनको, फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती सुरक्षित धनको, फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडला मे. त्रिशा एंटरप्रायजेस (कर्जदार), श्री. हर्षद शिवाजी वाघमोडे (सह-कर्जदार) आणि श्रीमती कल्पना हर्षद वाघमोडे (सह-कर्जदार) यांच्याकडून देय असलेली ०९/०६/२०२५ रोजी असलेली एकूण रु. ५०,४३,४१९/- (अक्षरी रुपये पन्नास लाख त्रेचाळीस हजार चारशे एकोणीस मात्र) म्हणजेच कर्ज खाते क्र. FEDMUMLAP0548705 मधील रु. ३४,४६,३४५/- (अक्षरी रुपये चौतीस लाख शेहेचाळीस हजार तीनशे पंचेचाळीस मात्र) आणि कर्ज खाते क्र. FEDMUM0BL0540618 मधील रु. १५,९७,०७४/- (अक्षरी रुपये पंधरा लाख सत्त्याण्णव हजार चौऱ्याहत्तर मात्र) ही रक्कम आणि त्यावरील १०/०६/२०२५ पासूनचे व्याज व खर्चाच्या वसुलीसाठी २९/०९/२०२६ रोजी सकाळी १०:०० ते सकाळी १०:३० या वेळेत जसे आहे जेथे आहे*, "जसे आहे तसे आहे* आणि जे काही आहे तेथे आहे* या तत्त्वावर विकली जाईल.

स्थावर मालमत्तेचे वर्णनः जुना सर्वे क्र. ६७४, नवीन सर्वे क्र. २६० हिस्सा क्र. २, क्षेत्रफळ २०८१ चौ. वार, म्हणजेच १७४० चौ. मीटर किंवा त्यासमीप असलेली जमीन किंवा भूखंडाचा सर्व भाग किंवा पार्सल, ज्यावर फ्लॅट क्र. ई-४, तळमजला, श्री राम सहारा, महसूल गाव भाईंदर, तालुका आणि जिल्हा ठाणे येथे स्थित आहे. चतुःसीमाः उत्तरेकडे - शिव संगर, पूर्वेकडे - जय रुडवा, दक्षिणेकडे - बी विंग, पश्चिमेकडे - कंपाऊंड वॉल.

राखीव किंमत (रुपयांमध्ये)	**रु. ४७,००,०००/- (अक्षरी रुपये सत्तेचाळीस लाख मात्र)**
ईएमडी रक्कम (रुपयांमध्ये) डीडी/पीओ/आरटीजीएस द्वारे 'फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड'च्या नावे	**रु. ४,७०,०००/- (अक्षरी रुपये चार लाख सत्तर हजार मात्र)**
बोली वाढीची रक्कम	**रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र)**
ईएमडीसह सीलबंद ऑफर/निविदेसह बोली जमा करण्याची अंतिम तारीख, वेळ आणि ठिकाण	२८ सप्टेंबर २०२६ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजेपर्यंत फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड, युनिट क्र. ११०१, ११वा मजला, सिग्नस, प्लॉट क्र. ७१ ए, पवई, पासपोली, मुंबई - ४०००८७ येथे
मालमत्तांची पाहणी	**२२ सप्टेंबर २०२६ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजेपूर्वी**
निश्चित यशस्वी बोलीदारासाठी स्वीकारलेल्या सर्वोच्च बोलीच्या २५% रक्कम भरण्याची अंतिम तारीख (ईएमडीसह)	**बोली निश्चितीच्या तारखेपासून पुढील कामकाजाच्या दिवसापर्यंत भरणा केला जावा.**
सर्वोच्च बोलीच्या उर्वरित ७५% रक्कम भरण्याची अंतिम तारीख	**बोली निश्चितीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत.**

विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तींसाठी, कृपया फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड (फेडफिना) या सुरक्षित धनकोची वेबसाईट म्हणजेच www.fedfina.com मध्ये दिलेल्या लिंकचा आणि ऑक्शन अंतर्गत https://www.fedfina.com/public-notice-for-auction-cum-sale/ या लिंकचा संदर्भ घ्यावा. कोणत्याही चौकशी, माहिती, मदत, प्रक्रिया आणि प्रशिक्षणासाठी कृपया फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी श्री. स्वप्नील मोरे - ९३२१७८९४०७, ई-मेल आयडी - swapnil.more@fedfina.com यांच्याशी संपर्क साधावा.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात तुमचे लक्ष सरफेसी कायदा, २००२च्या कलम १३च्या उप-कलम (८)च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

दिनांकः ०२/०९/२०२६, ठिकाणः ठाणे — **सही/- प्राधिकृत अधिकारी, फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडसाठी**

BAJAJ HOUSING FINANCE
बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालयः सेरेब्रम आयटी पार्क, बी२ बिल्डिंग, ५ वा मजला, कल्याणी नगर, पुणे, महाराष्ट्र ४११०१४
शाखा कार्यालयः ७ वा मजला, सुमेर प्लाझा, युनिट क्र. ७०२, मरोळ मरोशी रोड, संकष्ट पाडा वेलफेअर सोसायटी, मरोळ, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र - ४०००५९
प्राधिकृत अधिकाऱ्याचा तपशीलः नावः श्रावण कुमार विश्वकर्मा
ई-मेल आयडीः shravankumar.vishwakarma@bajajhousing.co.in मोबाईल क्र.: ९८१९१४१२०२ आणि ९७०२९१७१३५

परिशिष्ट ४-अ [नियम ८(६)] स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री नोटीस

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदींसोबत वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना नोटीस देण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सुरक्षित धनकोकडे गहाण/प्रभारित केली आहे, जिचा प्रत्यक्ष ताबा बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या (सुरक्षित धनको) प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, ती बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेडची खाली नमूद केलेली थकीत कर्जाची रक्कम, लागू व्याज, शुल्क आणि खर्चाच्या वसुलीसाठी "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "जे काही आहे त्या स्थितीत" आणि "कोणत्याही आश्रयाशिवाय" तत्त्वावर विकली जाईल.

कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदाराचा तपशील आणि कर्जाचा तपशील	स्थावर मालमत्तेचे वर्णन	ई-लिलावाचा तपशील
कर्ज खाते क्र.:- H405HHL0865287 आणि H405HLT0905715 **१. स्वप्नील कृष्णा गावकर (कर्जदार)** **२. कृष्णा सोनु गावकर (सह-कर्जदार)** **दोन्ही येथेः** पिंपळेश्वर सोसायटी, जनार्दन वैती वाडी, एस.टी. रोड, देवनार, शंकर मंदिराजवळ, मुंबई, टी.एफ. देवनार एस.ओ., मुंबई, महाराष्ट्र ४०००८८ **थकीत रक्कम - रु. १५,७५,६५६/-** (अक्षरी रुपये पंधरा लाख पंच्याहत्तर हजार सहाशे छप्पन्न मात्र) २९/०८/२०२६ रोजी आणि त्यापुढील २९/०८/२०२६ पासून जमा झालेले व्याज आणि शुल्क.	मालमत्तेची अनुसूची स्थावर मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, फ्लॅट क्र. ४१३, ४ था मजला, मॅरेथॉन नेक्स्टवर्ल्ड नोव्हा (बिल्डिंग झेड नोव्हा), मॅरेथॉन नेक्स्टवर्ल्ड, गाव बेटावडे, डोंबिवली पूर्व, तालुका आणि जिल्हा ठाणे - ४००६१२.	**ई-लिलावाची तारीखः-** ०६/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी १२:०० च्या दरम्यान ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह. केवायसीसह इसारा ठेव रक्कम (ईएमडी) जमा करण्याची अंतिम तारीखः- ०५/१०/२०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत (भा.प्र.वे.). **निरीक्षणाची तारीखः-** ०२/०९/२०२६ ते ०५/१०/२०२६ दरम्यान सकाळी ११:०० ते सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत (भा.प्र.वे.). **राखीव किंमतः** स्थावर मालमत्तेसाठी रु. १७,००,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख मात्र) **इसारा ठेव रक्कम** रु. १,७०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख सत्तर हजार मात्र) असेल म्हणजेच राखीव किंमतीच्या १०%. **वाढीव मूल्य** - रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) आणि अशा पटीत.
कर्ज खाते क्र.:- H405HHL1117359 आणि H405HLT1132321 **जितेंद्र डोहरे (कर्जदार)** येथेः फ्लॅट क्र. ७०२, एच विंग, गुरु आत्मान, ३६० डिग्री सर्कल जवळ, योगीधाम, कल्याण पश्चिम, ठाणे, महाराष्ट्र - ४२१३०१ **थकीत रक्कम - रु. ६४,१२,१८१/-** (अक्षरी रुपये चौसष्ट लाख बारा हजार एकशे एक्याऐंशी मात्र) ३०/०८/२०२६ रोजी आणि त्यापुढील ३०/०८/२०२६ पासून जमा झालेले व्याज आणि शुल्क.	मालमत्तेची अनुसूची स्थावर मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, फ्लॅट क्र. ७०२, एच विंग, ७ वा मजला, गुरु आत्मान बिल्डिंग, सर्व्हे क्र. २०, २१/१/१, २१/१/२, २४/१ (भाग) आणि २४/१ (भाग), योगीधाम रोड, गाव-गौरीपाडा, तालुका-कल्याण, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र-४२१३०१.	**ई-लिलावाची तारीखः-** ०६/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी १२:०० च्या दरम्यान ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह. केवायसीसह इसारा ठेव रक्कम (ईएमडी) जमा करण्याची अंतिम तारीखः- ०५/१०/२०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत (भा.प्र.वे.). **निरीक्षणाची तारीखः-** ०२/०९/२०२६ ते ०५/१०/२०२६ दरम्यान सकाळी ११:०० ते सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत (भा.प्र.वे.). **राखीव किंमतः** स्थावर मालमत्तेसाठी रु. ५६,००,०००/- (अक्षरी रुपये छप्पन्न लाख मात्र) **इसारा ठेव रक्कम** रु. ५,६०,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख साठ हजार मात्र) असेल म्हणजेच राखीव किंमतीच्या १०%. **वाढीव मूल्य** - रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) आणि अशा पटीत.

जाहीर लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेतः सुरक्षित मालमत्ता राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीत विकली जाणार नाही. लिलाव विक्री ई-लिलाव पोर्टलद्वारे ऑनलाइन होईल. ई-लिलाव https://bankauctions.in पोर्टलद्वारे, ०६/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी १२:०० च्या दरम्यान प्रत्येक ५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयं-विस्तारासह होईल. सविस्तर अटी आणि शर्तींसाठी कृपया कंपनीच्या https://www.bajajhousingfinance.in/auction-notices या वेबसाइट युआरएलचा संदर्भ घ्यावा किंवा कोणत्याही स्पष्टीकरणासाठी कृपया प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधावा.

नोटीसची तारीखः ०१-०९-२०२६
ठिकाणः मुंबई

प्राधिकृत अधिकारी
(श्रावण कुमार विश्वकर्मा)
बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात)

नोंदणीकृत कार्यालयः स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४ था मजला, डिव्हाईन चाईल्ड हायस्कूलच्या समोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३
सीआयएनः L99999MH1992PLC066213
(माननीय एनसीएलटीच्या २६ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या आदेशानुसार अवसायन प्रक्रियेतून जाणारी कंपनी)

ई-लिलावासाठी जाहीर घोषणा

नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांनुसार नोटीस

याद्वारे खालील स्वाक्षरीकर्त्याकडून सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात येते की, नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियम व अटींनुसार, जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात) ("कॉर्पोरेट कर्जदार") च्या मालकीच्या आणि कॉर्पोरेट कर्जदाराच्या अवसायन संपत्तीचा (लिक्विडेशन इस्टेट) भाग असलेल्या ७ मालमत्तांच्या (खालील तक्त्यात वर्णन केलेल्या) विक्रीसाठी ई-लिलावाद्वारे बोली मागवण्यात येत आहेत, जी विक्री "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "जसे आहे तसे आहे", "जे काही आहे त्या स्थितीत" आणि "कोणत्याही आश्रयाशिवाय" तत्त्वावर आणि कोणत्याही प्रतिनिधित्वाशिवाय, वॉरंटीशिवाय किंवा नुकसानभरपाईशिवाय केली जाईल.

सदर विक्री खालील स्वाक्षरीकर्त्याकडून इतर गोष्टींबरोबरच आयबीबीआय (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स, २०१६ चा नियम ३२ आणि ०२ सप्टेंबर २०२६ रोजीचे असेट सेल प्रोसेस मेमोरँडम ("एएसपीएम") च्या अनुपालनात, https://ibbi.baanknet.com वरील ई-लिलाव प्लॅटफॉर्म बँकनेट (पूर्वीचे ईबीक्रय) द्वारे केली जाईल. सर्व संभाव्य बोलीदारांना विनंती आहे की, त्यांनी हे लक्षात घ्यावे की सर्व पात्रता कागदपत्रे आणि इसारा ठेव रक्कम (ईएमडी) एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रे सादर करण्याच्या आवश्यकतांनुसार काटेकोरपणे आणि केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मवरच सादर केली जावी.

ई-लिलावासाठी महत्त्वाच्या तारखांचे वेळापत्रक	
पात्रता कागदपत्रे आणि ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर कलम २९ए अंतर्गत हमीपत्र सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	**सोमवार, १४ सप्टेंबर २०२६, सायंकाळी ६:०० वाजता (युटीसी+५:३०)**
ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर इसारा ठेव रक्कम (ईएमडी) जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	**सोमवार, १४ सप्टेंबर २०२६, सायंकाळी ६:३० वाजता (युटीसी+५:३०)**
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	**गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६, सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० पर्यंत**
अंतिम विक्री रकमेच्या भरण्याची अंतिम तारीख	खालील स्वाक्षरीकर्त्याकडून अंतिम विक्री रक्कम भरण्यासाठी मागणी पत्र जारी केल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत

रक्कम भारतीय रुपयात

अ. क्र.	मालमत्तेचे वर्णन	असेट आयडी	लिलाव आयडी	राखीव किंमत*	इसारा ठेव रक्कम (ईएमडी)	वाढीव मूल्य
१	ग्राऊंड सपोर्ट व्हेईकल्स - टाटा झेनॉन, मारुती ईको, जेनियो, ऑल्टो	3932	4713	रु. ३५,५५,८४३	रु. ३,५५,५८४	रु. १,७७,७९२
२	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेंट - ट्रेस्टल्स	3935	4714	रु. ३,४०,१५१	रु. ३४,०१५	रु. १७,००८
३	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेंट - कन्व्हेयर्स	3936	4715	रु. २९,०६,७०५	रु. २,९०,६७१	रु. १,४५,३३५
४	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेंट - पुशबॅक ट्रॅक्टर, जीपीयू, कार्ट्स इ.	3937	4716	रु. ८६,०८,६२७	रु. ८,६०,८६३	रु. ४,३०,४३१
५	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेंट - लिफ्ट्स, क्रेन्स इ.	3938	4717	रु. ३३,२५,०७८	रु. ३,३२,५०८	रु. १,६६,२५४
६	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेंट - ट्रॉलीज	3939	4718	रु. २८,२८,८०२	रु. २,८२,८८०	रु. १,४१,४४०
७	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेंट - ट्रॉलीज	3940	4719	रु. २८,३७,५८७	रु. २,८३,७५९	रु. १,४१,८७९

*कर, आकारणी, शुल्क, ड्युटीज, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम्स आणि विक्री पूर्ण करण्यासाठी लागू असलेले सर्व अत्यावश्यक खर्च वगळून, ज्याचे अधिक विशेष वर्णन एएसपीएमच्या कलम १९ (खर्च, व्यय आणि कर परिणाम) मध्ये केले आहे. खालील स्वाक्षरीकर्ता किंवा नुकसानभरपाई प्राप्त पक्षांकडून (जसे संबंधित एएसपीएममध्ये परिभाषित केले आहे) कोणतेही प्रतिनिधित्व, वॉरंटी किंवा नुकसानभरपाई दिली जाणार नाही.

महत्त्वाच्या टिपाः

१. वर सूचीबद्ध केलेल्या ७ मालमत्तांसाठी **बॉकनेट** पोर्टलवर ई-लिलाव आयोजित केला जाईल.
२. ही विक्री नोटीस एएसपीएमसोबत वाचली जावी, ज्यामध्ये मालमत्तांचा तपशील, आयबीसीच्या कलम २९ए अंतर्गत पात्रतेसाठी घोषणा, प्रतिज्ञापत्रे आणि हमीपत्रे, आणि 'ई-लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण व तांत्रिक अटी आणि शर्ती' समाविष्ट आहेत, जे बॉकनेटच्या **https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/auc-listing** वर वरील असेट आणि लिलाव आयडींसमोर किंवा कॉर्पोरेट कर्जदाराची वेबसाईट **www.jetairways.com** वर उपलब्ध आहेत.
३. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक पात्रता कागदपत्रे आणि ईएमडी केवळ आणि काटेकोरपणे ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) नुसार निर्धारित वेळेत सादर करावीत, लिक्विडेटरकडे (अवसायक) नाही.
४. ई-लिलाव प्लॅटफॉर्म आणि कागदपत्रे व ईएमडी सादर करण्याबाबत कोणत्याही शंका असल्यास, संभाव्य बोलीदारांना बॉकनेटशी +९१ ८२९१२२०२२० वर आणि support.baanknet@psballiance.com वर संपर्क साधण्याची विनंती आहे.
५. ई-लिलावाबाबत कोणत्याही शंका असल्यास, कृपया लिक्विडेटरचे प्राधिकृत प्रतिनिधी **श्री. श्लोक नंदनपवार (+९१-८२०८५०३६९३) यांच्याशी jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com** वर संपर्क साधावा, ज्याचा विषय "Ground Support Asset Sale - Mumbai" असावा. कृपया नोंद घ्यावी की पात्रता कागदपत्रे आणि बोलीशी संबंधित कोणतेही दस्तऐवज लिक्विडेटर, त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांच्या सल्लागाराकडे सादर केले जाऊ नयेत.
६. हे स्पष्ट केले जाते की ही नोटीस खालील स्वाक्षरीकर्त्यावर किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात) वर विक्री अंमलात आणण्यासाठी कोणतेही बंधनकारक दायित्व निर्माण करत नाही. खालील स्वाक्षरीकर्त्याने घेतलेला कोणताही निर्णय अंतिम आणि सर्व संभाव्य बोलीदारांवर बंधनकारक असेल.
७. हे स्पष्ट केले जाते की येथे आणि एएसपीएममध्ये दिलेला मालमत्तांचा तपशील काटेकोरपणे केवळ सामान्य संदर्भासाठी प्रदान केला आहे. नुकसानभरपाई प्राप्त पक्ष स्पष्टपणे अस्वीकार करतात आणि ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा नंतर अशी विसंगती आढळली तरीही, मालमत्तांच्या वर्णनात किंवा स्थितीत कोणत्याही प्रकारची कमतरता/अचूकता नसणे/विसंगती/चुकीचे विधान/वगळणे/बदल/तूट किंवा त्रुटीसाठी त्यांची कोणतीही जबाबदारी किंवा दायित्व असणार नाही. मालमत्तांची विक्री काटेकोरपणे "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "जसे आहे तसे आहे" आणि "आश्रयाशिवाय" तत्त्वावर आणि कोणत्याही प्रतिनिधित्वाशिवाय, वॉरंटीशिवाय किंवा नुकसानभरपाईशिवाय आयोजित केली जाते.
८. अंतिम विक्री रकमेचा भरणा एएसपीएमच्या कलम १५ (अंतिम विक्री रकमेचा भरणा) आणि १६ (विक्री पूर्ण करणे) मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादा, व्याज तरतुदी आणि जप्तीच्या अटींच्या अधीन आहे.
९. लिक्विडेटर (अवसायक) सीओसीच्या सल्ल्यानुसार, लागू कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या तरतुदींशिवाय आणि अपवाद वगळता, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा थांबवण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

सही/-
सतीश कुमार गुप्ता
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे लिक्विडेटर
आयपी नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00023/2016-17/10056
एएफए क्र.: AA1/10056/02/311226/108454
एएफए ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वैध
ईमेलः liquidation.jet@gmail.com

दिनांकः ०२ सप्टेंबर २०२६
ठिकाणः मुंबई

RHI MAGNESITA
आरएचआय मॅग्नेसिटा इंडिया लिमिटेड

सीआयएनः L28113MH2010PLC312871
नोंदणीकृत कार्यालयः युनिट क्र. ७०५, ७वा मजला, लोढा सुप्रीमस, कांजूरमार्ग व्हिलेज रोड, कांजूरमार्ग (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र - ४०००४२
दूरध्वनीः +९१ २२ ६६०९०६०० ई-मेलः corporate.india@rhimagnesita.com

(अ) सोळावी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि (ब) लाभांशासाठी पुस्तक बंद ठेवण्याबाबत (बुक क्लोजर)

आरएचआय मॅग्नेसिटा इंडिया लिमिटेडच्या **(कंपनी)** सदस्यांची सोळावी (१६ वी) वार्षिक सर्वसाधारण सभा **(एजीएम) मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता** (आयएसटी), व्हिडिओ कॉन्फरन्सिंग **(व्हीसी)** / अन्य दृक-श्राव्य माध्यमांद्वारे **(ओएव्हीएम)** आयोजित केली जाईल. ही सभा कंपनी कायदा, २०१३ आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम, भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५, आणि त्यासंदर्भात कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय **(एमसीए)** आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ **(सेबी)** यांनी वेळोवेळी जारी केलेली व सुधारित केलेली सर्व लागू परिपत्रके यांच्या अनुपालनात, एजीएम बोलावण्याच्या नोटिशीमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी आयोजित केली जात आहे.

एजीएमची नोटीस आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चे स्टँडअलोन आणि एकत्रित लेखापरीक्षित आर्थिक स्टेटमेंट्स, तसेच संचालक मंडळाचा अहवाल, लेखापरीक्षकांचा अहवाल आणि त्यासोबत जोडणे आवश्यक असलेली इतर कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने कंपनीच्या अशा सर्व सदस्यांना पाठवली जातील, ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी / कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट म्हणजेच स्कायलाईन फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड / डिपॉझिटरी पार्टिसिपंट/डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत. एजीएमची नोटीस आणि वरील कागदपत्रे कंपनीची वेबसाईट www.rhimagnesitaindia.com, स्टॉक एक्स्चेंजेस म्हणजेच बीएसई लिमिटेड **(बीएसई)** ची वेबसाईट www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड **(एनएसई)** ची वेबसाईट www.nseindia.com वर, आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड **(एनएसडीएल)** ची वेबसाईट **https://evoting.nsdl.com** वर देखील उपलब्ध असतील.

ई-मेल पत्ता नोंदणीकृत/अद्ययावत करण्याची पद्धतः

(अ) भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या आणि कंपनीकडे आपला ई-मेल पत्ता नोंदणीकृत/अद्ययावत न केलेल्या सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी योग्यरीत्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला फॉर्म आयएसआर-१ (कंपनीच्या वेबसाईटवर https://www.rhimagnesitaindia.com/uploads/pdf/365pdctfile_formisr1-.pdf येथे उपलब्ध) आवश्यक त्या समर्थनार्थ कागदपत्रांसह स्कायलाईन फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, डी-१५३ए, १ला मजला, ओखला इंडस्ट्रियल एरिया, फेज-I, नवी दिल्ली-११००२० येथे जमा करून आपला ई-मेल पत्ता नोंदणीकृत/अद्ययावत करावा. (ब) डिमटेरियलाईज्ड (डीमॅट) स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या आणि संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे आपला ई-मेल पत्ता नोंदणीकृत/अद्ययावत न केलेल्या सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी ज्यांच्याकडे त्यांचे डीमॅट खाते आहे, त्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे तो नोंदणीकृत/अद्ययावत करावा.

ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धतः

सदस्य एजीएमच्या नोटिशीमध्ये नमूद केलेल्या कामकाजावर इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे **(ई-व्होटिंग)** मतदान करू शकतात. डिमटेरियलाईज्ड स्वरूपात, भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या आणि ज्यांनी आपला ई-मेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही अशा सदस्यांसाठी रिमोटली मतदान करण्यासह **(रिमोट ई-व्होटिंग)** मतदानाची पद्धत एजीएमच्या नोटिशीत देण्यात आली आहे. जे सदस्य एजीएमला उपस्थित राहतील आणि ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केलेले नाही, ते एजीएममध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतील.

व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएममध्ये सामील होणेः

सदस्य व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएमला उपस्थित राहू शकतील. लॉगिन करण्यासाठी वापरावयाचे क्रेडेंशियल्स आणि एजीएमला उपस्थित राहण्यासाठीच्या प्रक्रियेची माहिती एजीएमच्या नोटिशीत स्पष्ट केली आहे.

लाभांशासाठी रेकॉर्ड तारीख आणि त्याचे प्रदान (पेमेंट)

(अ) कंपनीने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी अंतिम लाभांश मिळवण्यासाठी सदस्यांची पात्रता निश्चित करण्याच्या उद्देशाने **सोमवार, १४ सप्टेंबर २०२६** ही रेकॉर्ड तारीख निश्चित केली आहे. एजीएम आणि लाभांश प्रदानाच्या उद्देशाने कंपनीची सदस्यांची नोंदवही आणि शेअर हस्तांतरण पुस्तके **मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६ ते मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६** (दोनही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहतील.

(ब) जर संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार अंतिम लाभांशाला एजीएममध्ये मंजुरी मिळाली, तर उद्गम स्थानी कर कपातीच्या (टीडीएस) अधीन राहून अशा लाभांशाचे प्रदान **सोमवार, ५ ऑक्टोबर २०२६** पर्यंत खालीलप्रमाणे केले जाईलः

i. **सोमवार, १४ सप्टेंबर २०२६** रोजी दिवसाच्या अखेरीस नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड **(एनएसडीएल)** आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड **(सीडीएसएल)**, **(एकत्रितपणे डिपॉझिटरीज)** यांनी उपलब्ध करून दिलेल्या डेटानुसार डिमटेरियलाईज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सर्व लाभार्थी मालकांना;

ii. **सोमवार, १४ सप्टेंबर २०२६** रोजी कामकाजाच्या वेळेच्या अखेरीस कंपनीकडे दाखल केलेल्या वैध हस्तांतरण किंवा ट्रान्सपोझिशन विनंत्यांची नोंद घेतल्यानंतर भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सर्व सदस्यांना.

(क) ज्या सदस्यांनी कंपनीकडे आपल्या बँक खात्याचा तपशील नोंदणीकृत केला आहे, त्यांना लाभांशाचे प्रदान इलेक्ट्रॉनिक माध्यमातून केले जाईल.

लाभांश प्राप्त करण्यासाठी मँडेट नोंदणीकृत करण्याची पद्धतः

सदस्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांच्या बँक खात्याचा संपूर्ण तपशील खालीलप्रमाणे नोंदणीकृत/अद्ययावत करावाः

(अ) जर शेअर्स डिमटेरियलाईज्ड (डीमॅट) स्वरूपात धारण केले असतील, तर डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडून आवश्यक असलेले फॉर्म आणि कागदपत्रे जमा करून, ज्यांच्याकडे त्यांचे डीमॅट खाते आहे त्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे; आणि

(ब) जर शेअर्स भौतिक स्वरूपात धारण केले असतील, तर योग्यरीत्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला फॉर्म आयएसआर-१ आवश्यक त्या समर्थनार्थ कागदपत्रांसह स्कायलाईन फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडकडे वर नमूद केलेल्या पत्त्यावर जमा करून.

सदस्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी एजीएमची नोटीस काळजीपूर्वक वाचावी आणि विशेषतः एजीएममध्ये सामील होण्यासाठीच्या सूचना, रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा एजीएममध्ये मतदान करण्याच्या पद्धतीचे पालन करावे.

लाभांशावरील कर कपातीसाठी (टीडीएस) कागदपत्रेः

टीडीएस आवश्यकतांचे पालन करण्यासाठी, कंपनीला लागू असलेला योग्य टीडीएस/विथहोल्डिंग कर दर निश्चित करणे, कागदपत्रांची पडताळणी करणे आणि सूट प्रदान करणे शक्य व्हावे यासाठी, सदस्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी कंपनीच्या पूर्वीच्या सूचनांनुसार निर्दिष्ट केलेली आवश्यक कागदपत्रे **सोमवार, १४ सप्टेंबर २०२६** पर्यंत पाठवावीत. कागदपत्रे कंपनीच्या **Investors.india@rhimagnesita.com या ई-मेल पत्त्यावर पाठवावीत. कर निश्चिती/कपातीबाबत सोमवार, १४ सप्टेंबर २०२६ नंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही संवादाचा विचार केला जाणार नाही. इतर कोणत्याही ई-मेल आयडीवर पाठवलेल्या कागदपत्रांमुळे कागदपत्रे सादर न केल्याचे मानले जाऊ शकते आणि कायद्याच्या तरतुदींनुसार टीडीएस लागू होऊ शकतो. अशा प्रकारे कपात केलेल्या करांसाठी कंपनीविरुद्ध कोणताही दावा करता येणार नाही.**

आरएचआय मॅग्नेसिटा इंडिया लिमिटेडच्या
संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सही/-
संजय कुमार
कंपनी सेक्रेटरी
(एसीएसः १७०२१)

गुरुग्राम, दिनांकः १ सप्टेंबर २०२६

युनिलेक्स कलर्स अँड केमिकल्स लिमिटेड

सीआयएनः L74999MH2001PLC131352
नोंदणीकृत कार्यालयः १०६-१०७, अॅडव्हेंट अट्रिया, चिंचोली बंदर रोड, मालाड (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र ४०००६४ भारत.
दूरध्वनीः +९१ ९८२०४ ३०६७१ ई-मेलः cs@unilexcolours.in वेबसाईटः www.unilexcolours.in

२५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची आणि रिमोट ई-व्होटिंगची नोटीस

याद्वारे नोटीस देण्यात येते की, विविध एमसीए आणि सेबी परिपत्रकांनुसार एजीएम बोलावणाऱ्या नोटिशीत नमूद केलेल्या कामकाजावर विचारविनिमय करण्यासाठी **युनिलेक्स कलर्स अँड केमिकल्स लिमिटेडच्या** सदस्यांची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता (भा.प्र.वे.)** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / अन्य दृक-श्राव्य माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित केली जाईल.

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) जारी केलेले सामान्य परिपत्रक क्र. २०/२०२० दिनांक ०५ मे २०२०, क्र. ०९/२०२४ दिनांक १९ सप्टेंबर २०२४ आणि क्र. ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ आणि सेबीने जारी केलेले मास्टर परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD-PoD2-/P/CIR/0155 दिनांक ११ नोव्हेंबर २०२४ सह वाचले जाणारे परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CFD-PoD2-/P/CIR/133/2024 दिनांक ३ ऑक्टोबर २०२४, तसेच एमसीए आणि सेबीने जारी केलेली इतर परिपत्रके (एकत्रितपणे परिपत्रके* म्हणून संदर्भित) यांच्या अनुपालनात, एजीएम बोलावणाऱ्या नोटिशीत नमूद केलेल्या कामकाजावर विचारविनिमय करण्यासाठी कंपनीने आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालासह एजीएमची नोटीस मंगळवार, १ सप्टेंबर २०२६ रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्या सदस्यांना पाठवली आहे ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी / कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट किंवा डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे सहभागी होणारे सदस्य कंपनी कायदा, २०१३च्या कलम १०३ अंतर्गत गणपूर्तीच्या उद्देशाने ग्राह्य धरले जातील.

याव्यतिरिक्त, सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या नियम ३६(१)(बी) नुसार, ज्या भागधारकांचे ई-मेल आयडी कंपनी / आरटीए / डीपीकडे नोंदणीकृत नाहीत त्यांना आर्थिक वर्ष २०२५-२६च्या वार्षिक अहवालात प्रवेश करण्याच्या पाथसह वेब-लिंक प्रदान करणारे एक पत्र पाठवले गेले आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२०२६च्या वार्षिक अहवालासह एजीएमची नोटीस आणि इतर संबंधित कागदपत्रे कंपनीची वेबसाईट www.unilexcolours.in वर आणि एनएसई लिमिटेडची वेबसाईट www.nseindia.com वर देखील उपलब्ध आहेत.

वेळोवेळी सुधारित केलेल्या कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४चे नियम २०, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (लिस्टिंग रेग्युलेशन्स) चे नियम ४४ आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेले जनरल मीटिंग्सवरील सेक्रेटरिअल स्टँडर्ड - २ यांसह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा, २०१३च्या कलम १०८ च्या अनुपालनात, कंपनी सदस्यांना एजीएममध्ये मंजूर करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून आपला मतदानाचा हक्क बजावण्याची सुविधा उपलब्ध करून देताना आनंदित आहे. कंपनीने रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदानाची सुविधा, व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये सहभाग आणि एजीएम दरम्यान ई-व्होटिंगची सुविधा प्रदान करण्यासाठी एनएसडीएलची नियुक्ती केली आहे.

अ)	ई-व्होटिंगसाठी कट-ऑफ तारीख	बुधवार, १६ सप्टेंबर २०२६
ब)	रिमोट ई-व्होटिंगची सुरुवात	रविवार, २० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ०९:०० वाजता (भा.प्र.वे.)
क)	रिमोट ई-व्होटिंगची समाप्ती	मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजता (भा.प्र.वे.)

सदस्यांना एजीएमच्या नोटिशीत नमूद केलेल्या कामकाजावर रिमोटली किंवा एजीएम दरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे मत देण्याची संधी असेल. डिमटेरियलाईज्ड मोड, भौतिक मोडमध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांद्वारे आणि ज्यांनी आपले ई-मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांच्याद्वारे रिमोटली किंवा एजीएम दरम्यान मतदान करण्याची पद्धत एजीएम बोलावणाऱ्या नोटिशीत दिली आहे.

एजीएमची नोटीस पाठवल्यानंतर कंपनीचा सदस्य बनणारी आणि कट-ऑफ तारखेनुसार म्हणजेच बुधवार, १६ सप्टेंबर २०२६ रोजी शेअर्स धारण करणारी कोणतीही व्यक्ती evoting@nsdl.co.in किंवा ashok.sherugar@in.mpms.mufg.com वर विनंती पाठवून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. तथापि, जर सदस्य ई-व्होटिंगसाठी एनएसडीएलकडे आधीच नोंदणीकृत असेल तर तो ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्यासाठी विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतो.

मतदान प्रक्रियेची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने छाननी करण्यासाठी संचालक मंडळाने एनकेएम अँड असोसिएट्सच्या प्रोप्रायटर, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी सुश्री निकिता केडिया (सदस्यता क्र. A54970 आणि प्रॅक्टिस प्रमाणपत्र क्र. 20414) यांची स्क्रूटिनायझर म्हणून नियुक्ती केली आहे.

रिमोट ई-व्होटिंग किंवा एजीएममधील ई-व्होटिंगशी संबंधित कोणत्याही शंका/तक्रारी असल्यास, कृपया www.evoting.nsdl.com च्या मदत (Help) विभागामध्ये उपलब्ध असलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि सदस्यांसाठी ई-व्होटिंग युजर मॅन्युअल पहा किंवा ०२२-४८८६ ७००० आणि ०२२-२४९९ ७००० या टोल-फ्री क्रमांकावर कॉल करा किंवा सुश्री पल्लवी म्हात्रे यांना evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवा.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
युनिलेक्स कलर्स अँड केमिकल्स लिमिटेडसाठी
सही/-
गौरव मुंदडा
कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर

ठिकाणः मुंबई
दिनांकः १ सप्टेंबर २०२६

प्रकाश स्टीलेज लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः १०१, शत्रुंजय अपार्टमेंट, २८, सिंधी लेन, नानुभाई देसाई रोड, मुंबई - ४०० ००४.
सीआयएनः L27106MH1991PLC061595
दूरध्वनी क्र.: ०२२ ६६१३४५०० फॅक्स क्र.: ०२२ ६६१३४५९९
ई-मेलः cs@prakashsteelage.com वेबसाईटः www.prakashsteelage.com

व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / अन्य दृक-श्राव्य माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित केल्या जाणाऱ्या कंपनीच्या ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची जाहीर नोटीस

याद्वारे नोटीस देण्यात येते की, एजीएम बोलावणाऱ्या नोटिशीत नमूद केलेल्या कामकाजावर विचारविनिमय करण्यासाठी प्रकाश स्टीलेज लिमिटेडच्या (कंपनी) सदस्यांची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता (भा.प्र.वे.) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / अन्य दृक-श्राव्य माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित केली जाईल.

ही एजीएम कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ('लिस्टिंग रेग्युलेशन्स')च्या लागू तरतुदी आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय आणि सेबीने जारी केलेल्या सक्षम परिपत्रकांच्या तरतुदींच्या अनुपालनात आयोजित केली जाईल.

आर्थिक वर्ष २०२५-२६च्या वार्षिक अहवालासह एजीएमची नोटीस इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्या भागधारकांना पाठवली जाईल ज्यांचे ई-मेल आयडी कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत. ज्या सदस्यांनी आपले ई-मेल आयडी कंपनी / तिचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट ('आरटीए') किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत केलेले नाहीत, त्यांना वार्षिक अहवालात प्रवेश करण्यासाठी वेब-लिंक प्रदान करणारे एक पत्र पाठवले जाईल.

उपरोक्त कागदपत्रे कंपनीची वेबसाईट www.prakashsteelage.com वर आणि स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईट www.bseindia.com आणि www.nseindia.com वर उपलब्ध असतील. एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांनुसार, कोणत्याही भागधारकाला एजीएमची नोटीस आणि वार्षिक अहवालाच्या भौतिक प्रती पाठवल्या जाणार नाहीत.

ई-मेल पत्ते नोंदणीकृत आणि अपडेट करण्याची पद्धतः

अ) भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना विनंती आहे की त्यांनी आपले ई-मेल पत्ते नोंदणीकृत करण्यासाठी फोलिओ क्र., सदस्याचे (सदस्यांचे) नाव आणि पॅन कार्ड किंवा आधार कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत यांसारख्या आवश्यक कागदपत्रांसह cs@prakashsteelage.com / charmi@bigshareonline.com वर ई-मेल पाठवावा.

ब) डिमॅट मोडमध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना विनंती आहे की त्यांनी ई-मेल पत्ते नोंदणीकृत करण्यासाठी त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटशी संपर्क साधावा.

एजीएम दरम्यान रिमोट ई-व्होटिंग आणि ई-व्होटिंगची पद्धतः

कंपनी आपल्या भागधारकांना एजीएमच्या नोटिशीत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर आपले मत देण्यासाठी ई-व्होटिंगची सुविधा (रिमोट ई-व्होटिंग) उपलब्ध करून देत आहे. याव्यतिरिक्त, कंपनीकडे एजीएम दरम्यान ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची सुविधा (ई-व्होटिंग) आहे. इलेक्ट्रॉनिक मोड/भौतिक मोडमध्ये शेअर्स धारण करणाऱ्या भागधारकांद्वारे एजीएम दरम्यान रिमोट ई-व्होटिंग आणि ई-व्होटिंग करण्याची प्रक्रिया एजीएमच्या नोटिशीत दिली जाईल.

प्रकाश स्टीलेज लिमिटेडसाठी
सही/-
प्रकाश सी. कानूनगो
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः 00286366

ठिकाणः मुंबई
दिनांकः ०१ सप्टेंबर २०२६

फिल्ट्रा कन्सल्टंट्स अँड इंजिनियर्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः डब्ल्यू-२७, टी ब्लॉक, एमआयडीसी, भोसरी, हवेली, पुणे-४११०२६
एफसी. दूरध्वनीः ८४४६२९४००२ / ८४४६२९४००३ ई-मेलः dir@filtra.in
वेबसाईटः www.filtra.in सीआयएनः L41000PN2011PLC209700

१५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस, पुस्तक बंद ठेवण्याबाबत (बुक क्लोजर), रेकॉर्ड तारीख आणि ई-व्होटिंगची माहिती

याद्वारे सूचित केले जाते की, एजीएमच्या नोटिशीत नमूद केलेल्या कामकाजावर केवळ ई-व्होटिंग सुविधेद्वारे विचारविनिमय करण्यासाठी **फिल्ट्रा कन्सल्टंट्स अँड इंजिनियर्स लिमिटेडच्या** सदस्यांची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) गुरुवार, २४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता (भा.प्र.वे.) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / अन्य दृक-श्राव्य माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित केली जाईल.

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेले सामान्य परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांक ०८ एप्रिल २०२० आणि या संदर्भात जारी केलेली त्यानंतरची परिपत्रके, ज्यातील नवीनतम परिपत्रक सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ (एकत्रितपणे "एमसीए परिपत्रके" म्हणून संदर्भित) आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (लिस्टिंग रेग्युलेशन्स) च्या नियम ३६(१)(ए) च्या अनुपालनात, आर्थिक वर्ष २०२५-२६च्या वार्षिक अहवालाच्या वेब-लिंकसह एजीएमची नोटीस केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्या सदस्यांना पाठवण्यात आली आहे ज्यांचे ई-मेल आयडी कंपनी / डिपॉझिटरीज / रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंट (आर अँड टीए) कडे नोंदणीकृत आहेत.

पुढे, लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या नियम ३६(१)(बी) नुसार, ज्या भागधारकांचे ई-मेल पत्ते कंपनी / डिपॉझिटरीज / आर अँड टीएकडे नोंदणीकृत नाहीत, त्यांना कंपनी एक पत्र पाठवत आहे ज्यामध्ये वेब-लिंक प्रदान केली आहे जिथून कंपनीच्या वेबसाईटवर आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालात प्रवेश करता येईल.

एजीएमची नोटीस आणि वार्षिक अहवाल २०२५-२६ कंपनीची वेबसाईट www.filtra.in वर आणि स्टॉक एक्स्चेंज म्हणजेच बीएसई लिमिटेडची वेबसाईट www.bseindia.com वरून पाहता आणि डाउनलोड करता येतील. एजीएमची नोटीस नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) ची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर देखील उपलब्ध असेल.

सभेच्या नोटिशीत नमूद केल्याप्रमाणे सदस्य सामायिक ठिकाणी सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय केवळ व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएमला उपस्थित राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात. कंपनी कायदा, २०१३च्या कलम १०३ अंतर्गत गणपूर्ती मोजण्याच्या उद्देशाने व्हीसी/ओएव्हीएमद्वारे उपस्थित असलेल्या सदस्यांची गणना केली जाईल. एजीएमच्या नोटिशीत संदर्भित सर्व कागदपत्रांच्या इलेक्ट्रॉनिक प्रती सदस्यांना या नोटिशीच्या वितरणाच्या तारखेपासून १५ व्या एजीएमच्या तारखेपर्यंत कोणत्याही शुल्काविना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने तपासणीसाठी उपलब्ध केल्या जातील. अशी कागदपत्रे तपासू इच्छिणारे सदस्य cs@filtra.in वर ई-मेल पाठवू शकतात.

जी व्यक्ती नोटीस पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स मिळवते आणि कंपनीची सदस्य बनते परंतु जी कट-ऑफ तारखेनुसार म्हणजेच गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ रोजी शेअर्स धारण करत असेल, ती evoting@nsdl.com वर विनंती पाठवून ई-व्होटिंगसाठी युजर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. ई-व्होटिंगसाठी युजर आयडी आणि पासवर्ड मिळवण्याच्या इतर पद्धती एजीएमच्या नोटिशीत दिल्या आहेत.

एजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंग, एजीएम दरम्यान ई-व्होटिंग आणि एजीएममध्ये सामील होण्यासाठी सूचनाः

रिमोट ई-व्होटिंग, एजीएममधील मतदान आणि एजीएममध्ये सामील होण्यासाठीची सविस्तर प्रक्रिया एजीएमच्या नोटिशीतील टिपांमध्ये नमूद केली आहे.

लॉगिन क्रेडेंशिअल्स आणि पासवर्डचे तपशील सदस्यांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल आयडीवर ई-मेल केले जातात.

रिमोट ई-व्होटिंगशी संबंधित (एजीएमपूर्वी आणि/किंवा एजीएम दरम्यान) कोणत्याही शंका/तक्रारी असल्यास, तुम्ही www.evoting.nsdl.com च्या 'डाउनलोड्स' विभागामध्ये उपलब्ध असलेले भागधारकांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि भागधारकांसाठी ई-व्होटिंग युजर मॅन्युअल पाहू शकता किंवा ०२२-४८८६ ७००० वर कॉल करू शकता किंवा evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवू शकता.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदानाच्या सुविधेशी संबंधित तक्रारींचे निवारण करण्यासाठी जबाबदार व्यक्तीः श्री. सुकेथ शेट्टी, व्यवस्थापक, evoting@nsdl.co.in, दूरध्वनी क्र.: ०२२-४८८६ ७०००.

- ज्या सदस्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही, त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने एजीएमची नोटीस आणि वार्षिक अहवाल मिळवण्यासाठी आणि ई-व्होटिंगसाठी लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवण्यासाठी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत करण्यासाठी खाली नमूद केलेल्या प्रक्रियेचे अनुसरण करण्याची विनंती केली गेलीः
- जर शेअर्स भौतिक मोडमध्ये धारण केले असतील तर कृपया फोलिओ क्र., भागधारकाचे नाव, शेअर प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत (पुढील आणि मागील बाजू), पॅन (पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत), आधार (आधार कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत) **cs@filtra.in** वर ई-मेलद्वारे प्रदान करा.
- जर शेअर्स डिमॅट मोडमध्ये धारण केले असतील तर कृपया डीपीआयडी-सीएलआयडी (१६ अंकी डीपीआयडी + सीएलआयडी किंवा १६ अंकी लाभार्थी आयडी), नाव, क्लायंट मास्टर किंवा एकत्रित खाते विवरणाची प्रत, पॅन (पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत), आधार (आधार कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत) **cs@filtra.in** वर प्रदान करा.

कृपया नोंद घ्या की, या प्रक्रियेद्वारे ई-मेल पत्त्याची नोंदणी केवळ एजीएमची नोटीस आणि ई-व्होटिंगसाठी लॉगिन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्याच्या मर्यादित उद्देशासाठी तात्पुरत्या स्वरूपात एजीएमपर्यंतच आहे. ई-मेल पत्ता कायमस्वरूपी नोंदणीकृत / प्रमाणित / अपडेट करण्यासाठी, कृपया शेअर्स भौतिक मोडमध्ये धारण केले असल्यास आर अँड टीए, मे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी किंवा शेअर्स इलेक्ट्रॉनिक मोडमध्ये धारण केले असल्यास तुमच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सशी संपर्क साधा.

- जर सदस्य एनएसडीएल ई-व्होटिंग प्लॅटफॉर्मवर आधीच नोंदणीकृत असेल, तर तो लॉग-इन करण्यासाठी त्याचा विद्यमान पासवर्ड वापरू शकतो.
- कोणतीही व्यक्ती जी नोटीस पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स मिळवते आणि कंपनीचा सदस्य बनते आणि कट-ऑफ तारखेनुसार म्हणजेच शुक्रवार, २८ ऑगस्ट २०२६ रोजी शेअर्स धारण करते, ती evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. तथापि, जर तो/ती रिमोट ई-व्होटिंगसाठी एनएसडीएलकडे आधीच नोंदणीकृत असेल तर तो/ती मत देण्यासाठी त्याचा/तिचा विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतो/शकते.

याद्वारे कंपनी कायदा, २०१३चे कलम ९१ आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम आणि लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या नियम ४२ नुसार **नोटीस** देण्यात येते की, एजीएम आणि लाभांशाच्या उद्देशाने कंपनीची सदस्यांची नोंदवही आणि शेअर हस्तांतरण पुस्तक गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ ते गुरुवार, २४ सप्टेंबर २०२६ (दोनही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहील आणि गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ ही रेकॉर्ड तारीख निश्चित करण्यात आली आहे.

कंपनी कायदा, २०१३चे कलम १०८, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४चे नियम २०, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५चे नियम ४४ आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेले जनरल मीटिंगवरील सेक्रेटरिअल स्टँडर्ड्स ("एसएस-२") यांसह वाचल्या जाणाऱ्या वर संदर्भित एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांनुसार, कंपनी आपल्या सर्व सदस्यांना एजीएमच्या नोटिशीत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे (ई-व्होटिंग) आपले मत देण्याची सुविधा उपलब्ध करून देत आहे. कंपनीने १५ व्या एजीएमसाठी ई-व्होटिंग सुविधेसाठी प्लॅटफॉर्म प्रदान करण्यासाठी एनएसडीएलची नियुक्ती केली आहे.

ई-व्होटिंग वेळापत्रकाचा तपशील खालीलप्रमाणे आहेः

१. ई-व्होटिंगच्या उद्देशाने कट-ऑफ तारीखः **गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६**
२. नोटीस पाठवण्याची प्रक्रिया पूर्ण होण्याची तारीखः **मंगळवार, ०१ सप्टेंबर २०२६**
३. ई-व्होटिंग सुरू होण्याची तारीख आणि वेळः **सोमवार, २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी** ०९:०० वाजता (भा.प्र.वे.)
४. ई-व्होटिंग समाप्त होण्याची तारीख आणि वेळः **बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजता (भा.प्र.वे.)**

सर्व भागधारकांचे लक्ष वेधण्यात येते कीः

- बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेनंतर (भा.प्र.वे.) रिमोट ई-व्होटिंगला परवानगी दिली जाणार नाही. त्यानंतर मतदानासाठी रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल ब्लॉक / बंद केले जाईल;
- रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपला मतदानाचा हक्क बजावल्यानंतरही सदस्य सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकतो परंतु त्याला पुन्हा मत देण्याचा अधिकार असणार नाही;
- जे सदस्य व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएमला उपस्थित आहेत आणि ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केलेले नाही, त्यांच्यासाठी कंपनी एजीएम दरम्यान ई-व्होटिंगची सुविधा देखील उपलब्ध करून देईल. सदस्यांनी ई-व्होटिंगद्वारे ठरावावर एकदा मत दिल्यास, सदस्यांना ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही; आणि
- कट-ऑफ तारखेनुसार म्हणजेच **गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६** रोजी असलेले सदस्यच १५ व्या एजीएमच्या नोटिशीतील टिपांमध्ये दिलेल्या प्रक्रियेनुसार रिमोट ई-व्होटिंग सुविधेचा लाभ घेण्यास किंवा, जसे असेल तसे, सदर नोटिशीत नमूद केलेल्या कामकाजाच्या संदर्भात मतदानासाठी सर्वसाधारण सभेदरम्यान पात्र असतील.

फिल्ट्रा कन्सल्टंट्स अँड इंजिनियर्स लिमिटेडसाठी
सही/-
केतन भूपेंद्र खांट
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः 03506163

दिनांकः ०१ सप्टेंबर २०२६
ठिकाणः मुंबई